# बालदिनानिमित्त बालकांची पोलीस अधीक्षक कार्यालयास भेट

बालदिनाचे औचित्य साधून कुरूळ-अलिबाग येथील सु.ए.सो. माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थांनी रायगड जिल्हा अपर पोलीस अधीक्षक श्री.संजयकुमार पाटील यांची प्रत्यक्ष मुलाखत घेतली. यावेळी रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयातील विविध विभागांची पाहणी करून कशाप्रकारे कार्य चालते यांची माहिती घेतली. सदर वेळी बिनतारी संदेश, सायबर पोलीस ठाणे, पोलीस नियंत्रण कक्ष, समाधान कक्ष, या ठिकाणी भेट देण्यात आली. याबरोबर पोलिसांकडून कशा प्रकारे तक्रारीचे निराकरण करण्यात येते, एखाद्या जमावावर कशाप्रकारे नियंत्रण करता येते या व अशा इतर अनेक शंकांचे निरसन ह्यावेळी करण्यात आले. बालदिनानिमित झालेल्या ह्या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना पोलिसांचे कार्य कसे चालते याची चांगल्या प्रकारे ओळख झाली.









